# आदर्श विज्ञान, जे.बी. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

## राष्ट्रीय सेवा योजना

## सत्र २०१९-२० मध्ये संपन्न झालेल्या नियमित कार्यक्रम /उपक्रमांचा अहवाल

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत आदर्श महाविद्यालय येथे रा.से.यो. पथकामध्ये २०१९-२० या शैक्षणिक सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत एकूण २०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या शैक्षणिक सत्रामध्ये खालील प्रमाणे नाविन्यपूर्ण व नियमित उपक्रम किवा कार्यक्रम घेण्यात आले. **पर्यावरण संवर्धन, योग, वृक्षारोपण व वृक्ष-संवर्धन, हरित सेना, उन्नत भारत अभियान, आपत्ती व्यवस्थापन, अनाथ, अपंग व पूरग्रस्तांना मदत, प्लास्टिक निर्मुलन, महाविद्यालय व ग्राम-स्वच्छता, आरोग्य, सेवा, सुरक्षा, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मुलन, एड्स जनजागृती, महिला सक्षमीकरण, सायकल रेली**, इत्यादी उद्देश घेवून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनात व **डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी यांच्या संकल्पना व नेतृत्वात**, प्रा.श्रीकांत पाटील सहायक कार्यक्रम अधिकारी आणि डॉ.सौ.माधुरी कोपुलवार महिला सहायक कार्यक्रम अधिकारी यांच्या संयोजनाखाली, विशाल मोकाशे, आदर्श बरवट,





रोषण वरठी, कु.पायल गुप्ता, तेजस भागवत, अनिकेत देवगडे, कु. रिद्धी भांडे, कु.रचना शर्मा, आदित्य मोहोड, प्रा.विलास नागोसे यांच्या सहकार्याने व २०० स्वयंसेवकाच्या मोठ्या मेहनतीने व उत्साहात पार पडले.

१. **पर्यावरण पूरक २५०० सीड बॉल उपक्रम (ग्रीन आर्मी)** : जून च्या उन्हाळयामध्ये १५ दिवस पर्यावरण पूरक असा सीड बॉल निर्मिती व वाटप उपक्रम करण्यात आला. विविध प्रकारच्या झाडांच्या बियांचे २५०० बीज गोळे तयार करून शाळा, महाविद्यालये व विविध शासकीय विभागामध्ये वितरीत करण्यात आले होते. ते सीड-बॉल ओसाड जागी फेकून या पर्यावरण पूरक अभियानामध्ये रा.से.यो.चे व कनिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच शिक्षकानी सहभाग घेतला.पर्यावरण वाचवण्याचा संदेश देत या अनुषंगाने महाविद्यालयाची ग्रीन आर्मी स्थापन करायचे ठरविले.



२. **आंतरराष्ट्रीय योग दिवस** : शासकीय आदेशानुसार महाविद्यालयामध्ये दिनांक २१.०६.२०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. क्रीडा विभाग, NSS, NCC यांनी मिळून आयोजित केलेल्या या दिनाकरिता श्री अंकुश ठाकरे तसेच डॉ माधुरी कोपुलवार यांनी योग-प्रशिक्षक ची भूमिका बजावली. यामध्ये विविध योग व आसने जसे मयुरासन, त्रिकोणासन, वृक्षासन, प्राणायाम, भ्रामरी इत्यादी करण्यात आले. या अभियानामध्ये रा.से.यो. चे विद्यार्थी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी सहभाग घेतला.

३. **वृक्षारोपण सप्ताह व वृक्षसंवर्धन कार्यक्रम** : शासकीय आदेशानुसार महाविद्यालयामध्ये दिनांक ०१.०७.२०१९ रोजी पासून वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करण्यात आले. प्रथम खड्डे खणून ठेवून नर्सरीमधून १३० वृक्ष लागवडीकरिता प्राप्त झाले. महाविद्यालयामधील परिसरामध्ये विविध जातींच्या






जसे वड, पिंपळ, करंज, कडूनिंब, सप्तपर्णी, निलगिरी, कांचन, सीताफळ अश्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षांच्या संरक्षणासाठी बाबूंचे कठडे तयार करण्यात आले या अभियानामध्ये वृक्षारोपण तसेच वृक्ष संवर्धन करिता रा.से.यो.चे विद्यार्थी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी व राष्ट्रीय छात्र सेनेच्या

विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यानी सहभाग घेतला. या कार्यामध्ये डॉ.संदीप धवणे व मित्र परिवार आणि माजी विद्यार्थीनी सुद्धा सहयोग केले व या निमित्ताने १००० वृक्ष लागवडीचा सर्वांनी संकल्प केला.

४. **५० दिवसात १२ गावात १००० पेक्षा जास्त झाडांची लागवड** : दिनांक १ जुलै पासून २० ऑगस्ट २०१९ पर्यंत पूर्वनियोजित खड्डे तयार करून व २०० विद्यार्थ्यांच्या १२ गावात झाडे लावण्यासाठी त्यांना प्रेरित करीत धामणगाव रेल्वे तालुक्यातील S.O.S. धामणगाव, वाढोणा, काशिखेड, कामनापूर घुसळी, नारगावंडी, सावळा, आजनगाव, देवगाव, कावली, जुना धामणगाव, शहापूर, अशोकनगर असे १००० पेक्षा जास्त झाडांची लागवड Geo-tag सह करण्यात आली. यावेळी **'सेल्फी विथ ट्री'** या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद भेटला व अश्याप्रकारे **रासेयो ची ग्रीन आर्मी** स्थापन झाली. हा उपक्रम साध्य करण्यासाठी रा.से.यो.चे सर्व विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली व प्रोत्साहन म्हणून सर्वात जास्त झाडे लावणाऱ्या ५ विद्यार्थीची निवड करण्यात आली, पैकी सर्वात जास्त झाडे लावणाऱ्या स्व. नयन निहिटे याचा वृक्ष मित्र प्रथम पुरस्कार साठी उदघाटन कार्यक्रम प्रसंगी गौरव करण्यात आला.

५. **तंबाखू मुक्ती दिन व शपथ** : दि. ११ जुलै २०१९ ला महाविद्यालयात रासेयो तर्फे तंबाखू मुक्ती दिन व शपथ हा कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ गांडोळे यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू व्यसनमुक्ती ची शपथ दिली. महाविद्यालयात कुठेही खर्रा, तंबाखू व तत्सम पदार्थ आम्ही महाविद्यालयात दिसू देणार नाही असा प्रण सर्व रासेयो विद्यार्थ्यांनी घेतला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात सर्व स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.




६. **राज्यस्तरीय व्यवसाय योजना स्पर्धेत सहभाग** : दि. ४ व ५ सप्टेंबर ला अमरावती विद्यापीठ आयोजित स्टार्ट अप स्पर्धेत कार्यक्रम अधिकारी डॉ नागपुरे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ आनंद नरांजे व प्रा. रुपेश डहाके यांनी भाग घेतला व एका शेतकरी हिताच्या व्यावसायिक संकल्पनेला स्पर्धेत मांडले. त्यांची कल्पना परीक्षकांना भावली व टाटा ट्रस्ट च्या लोकांनी तर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असे संबोधले व पुढील कार्यासाठी एक कॉपी सुद्धा मागितली. आणि सदर स्पर्धेचे प्रमाणपत्र ही मिळविले.

७. **युवा माहिती दूत** : दि. १ जुलै ते २४ सप्टेंबर या कालावधीत कार्यक्रम अधिकारी डॉ नरेंद्र नागपुरे यांच्या मार्गदर्शनात शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचा युवा माहिती दूत उपक्रम रासेयो तर्फे राबविला. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. प्रती ५० व्यक्ती असा ८४ विद्यार्थ्यांनी हा उपक्रम पूर्ण केला व प्रमाणपत्र ही मिळविले. आदर्श महाविद्यालयाचा आकडा व क्रम धामणगाव रेल्वे व चांदूर रेल्वे तालुक्यामध्ये सर्वात जास्त होता असे प्रतिपादन युवा माहिती दूत समन्वयक श्री भूषण धुर्वे यानी केले.




८. **आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा**: दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी रासेयो पथक व दामिनी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक म्हणून अकोला येथील शिवाजी कॉलेजचे डॉ सुधीर कोहचाडे आले होते. यामध्ये त्यांनी व त्यांच्या चमूने विविध प्रात्यक्षिक सादर करून दाखविली. प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून उपस्थित विद्यार्थी व स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सर्व रा.से.यो. स्वयंसेवकांनी, राष्ट्रीय छात्र सेनेच्या व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

९. **मानवाधिकार कार्यशाळा** : एक महिन्यापूर्वी अभ्यासाची सामुग्री देवून आदर्श महाविद्यालय व टेक ट्रेनर प्रा. ली. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय मानवाधिकार व घटनात्मक अधिकार यावर कार्यशाळा व परीक्षा घेण्यात आली. महाविद्यालयातील १७५ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. यामध्ये विविध कायद्याविषयी व अधिकाराविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेचे प्रमाणपत्र सुद्धा देण्यात आले.






**१०.सेवा, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य पंधरवडा (कोल्हापूर, भामरागड, पुलगाव येथे मदत)** : दि. १० सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०१९ हा सेवा, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य पंधरवडा राबविण्यात आला. सर्व प्रथम कोल्हापूर, सांगली व सातारा येथील पूरग्रस्तांना मदत म्हणून रासेयो तर्फे धान्य व साहित्य पुलगाव युथ ग्रुप च्या मदतीने पाठविण्यात आले. त्यानंतर दि १९ सप्टेंबर रोजी धामणगाव रेल्वे परिसरातील नगर परिषद डॉ बाबासाहेब आंबेडकर शाळा व न.प. उर्दू प्राथमिक शाळा या २ शाळांतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना रासेयो तर्फे शालेय वस्तू भेट देण्यात आल्या. दि २१ सप्टेंबर ला संकट कालीन परिस्थिती हाताळता यावी म्हणून आदर्श महाविद्यालयाची **आदर्श रेस्क्यू फोर्स (ARF) स्थापन** झाली, याप्रसंगी आपत्ती व्यवस्थापनविषयी मार्गदर्शन व सुरक्षेचे धडे विद्यार्थ्यांना देण्यात आले. दरम्यान २३ सप्टेंबर ला महाविद्यालय स्वच्छता व रंगरंगोटी करण्यात आली व २ ऑक्टो. ला स्वच्छता दिंडी आयोजित करण्यात आली. त्यानंतर २६ ते २८ सप्टे.२०१९ रोजी भामरागड, गडचिरोली येथील पूरग्रस्तांना मदत म्हणून रासेयो चमू तर्फे अन्नधान्य, कपडे, ब्लंकेट व अन्य साहित्य वाटप करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे व चार स्वयंसेवक स्वतः घेवून गेले. सामान नेण्यासाठी वाहतूक खर्च महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.योगेंद्र गांडोळे यांनी केला. याप्रसंगी भामरागड, **गडचिरोली येथील जिल्हाधिकारी यांचेतर्फे महाराष्ट्र शासनाचे विशेष प्रशस्ती पत्र** सुद्धा मिळाले. दि. ४ ऑक्टो. २०१९ रोजी पुलगाव येथील श्री चिंतामणी विशेष मुलांची आश्रम शाळेला कार्यक्रम अधिकारी डॉ नरेंद्र नागपुरे यांचे तर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना गणवेश व दुध बिस्किटे वितरीत करण्यात आले. या सर्व प्रसंगी प्रा.श्रीकांत पाटील सहायक कार्यक्रम अधिकारी, डॉ.सौ.माधुरी कोपुलवार महिला सहायक कार्यक्रम अधिकारी, सौ श्रद्धा नागपुरे व इतर दान-दात्यासह सर्वच स्वयंसेवकांनी सर्वतोपरी सहकार्य केले व खूप परिश्रम घेतले.

**११.स्वच्छता दिंडी व वर्धमनेरी येथे मदत ('से नो टू प्लास्टिक' अभियान)** : म.गांधी व शास्त्री जयंती निमित्ताने २ ऑक्टोबर २०१९ रोजी आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे व हिराबाई गोयंका कन्या शाळा, धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता दिंडी चे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्या सह वनपाल श्री माळोदे व प्रा.डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी, तसेच डॉ माधुरी कोपुलवार महिला सहायक कार्यक्रम अधिकारी या रेलीमध्ये उपस्थित होते. नगर परिषद च्या **'से नो टू प्लास्टिक' अभियान** अंतर्गत यावेळी महाविद्यालयातील हरित सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते. काही विद्यार्थी घेवून रासेयो चमू वर्धमनेरी येथील संत भानुदास आश्रमच्या विशेष / दिव्यांग (अपंग, अनाथ, मतीमंद, गतिमंद) मुलांना कपडे, शालेय वस्तू चे वाटप व दुध बिस्किटे वाटप करण्यासाठी गेले व एक माणुसकीचा वेगळा अनुभव घेवून परतले.




**१२.स्वच्छ भारत अभियान (महाविद्यालय स्वच्छता, वृक्ष संवर्धन व रंगरंगोटी)** : शासकीय आदेशानुसार संपूर्ण महाविद्यालयात तीन टप्प्यात स्वच्छ करून 'स्वच्छ भारत अभियान मोहीम' राबविण्यात आली. दि. २३ सप्टेंबर ला महाविद्यालय परिसरातील वृक्षाना जागविण्यासाठी कठडे व झाडांना रंगरंगोटी करण्यात आली. यामध्ये तेजस भागवत, अनिकेत देवगडे, संकेत दिलपे सह अन्य स्वयंसेवकांनी महत्वाची भूमिका बजावली. या अभियानामध्ये रा.से.यो.चे सर्व विद्यार्थी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी सोबत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी सहभाग नोंदविला.






**१३. निर्माल्य संकलन (खत निर्मिती)**: गणपती उत्सवा दरम्यान रासेयो स्वयंसेवक जेथे गणपती बसतात तेथे व राहत्या गावी जाऊन निर्माल्य गोळा केले व ते गोळा करून महाविद्यालयातील आदर्श उद्यान मध्ये एका खड्यात पुरविले व त्यातून गार्डन करिता खत निर्मिती झाली. अश्या प्रकारे पर्यावरणाला सुद्धा हातभार लागला.

**१४. राष्ट्रीय सेवा योजना उदघाटन सोहळा :**



स्थानिक महाविद्यालयामध्ये प्रा. डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो. यांच्या संयोजनाखाली ‘स्वच्छता हि सेवा’ करीत रा.से.यो. दिनी दि.२४.०९.२०१९ रोजी “राष्ट्रीय सेवा योजना उदघाटन सोहळा” पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.योगेंद्र गांडोळे व डॉ ए.जी. गड्डमवार व किशोर पाथरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ नरेंद्र नागपुरे यांच्या प्रस्तावनेने करण्यात आली. डॉ माधुरी कोपुलवार महिला सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी रा.से.यो. पथकाचे उदघाटन करून विद्यार्थ्यांना व उपस्थिताना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गांडोळे यांनी अध्यक्षीय भाषणातून रा.से.यो. चे उद्दिष्ट्ये व त्याचे महत्त्व पटवून दिले. याच कार्यक्रमा दरम्यान प्रत्येक वर्गाकरिता एक **‘टाकाऊ पासून टिकाऊ’** अशी कचरा पेटी स्वच्छतेचा संदेश देत वर्गात भेट देण्यात आली. या वेळी प्रा.श्रीकांत पाटील सह-कार्यक्रम अधिकारी यांनी राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे केलेल्या उपक्रमाची माहिती व आदर्श महाविद्यालयाचे वतीने भामरागड येथील पूरग्रस्तांना मदत साहित्य गोळा करण्यात आले होते त्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन आदर्श बरवट याने तर आभार प्रदर्शन विशाल मोकाशे याने केले.




१५.**रेल्वे स्टेशन सफाई अभियान** : दि.२४ सप्टेंबर २०१९ रोजी स्थानिक आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजने तर्फे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.यांच्या संयोजनाखाली, डॉ माधुरी कोपुलवार, प्रा. श्रीकांत पाटील व श्री विशाल सुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत धामणगाव रेल्वे स्टेशन येथे सफाई अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये प्रथम शहीद चौक येथे भगत सिंग यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून परिसरातील प्लास्टिक केर-कचरा साफ करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या निमित्त स्टेशन मास्टर, डॉ. किशोर बारापात्रे, रा.से.यो.चे सर्व विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

१६.**वृक्षाबंधन** : ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे’ या उक्तीचा मतितार्थ लक्षात घेवून वृक्ष हे आपल्या भावासारखेच आहेत म्हणून रक्षाबंधन च्या दुसऱ्याच दिवशी वृक्षाबंधन हा कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधून त्याचे संगोपन, संवर्धन व रक्षणाची प्रतिज्ञा केली. यासाठी अनेक रासेयो विद्यार्थी उपस्थित होते.

१७.**मतदार जनजागृती अभियान व राष्ट्रीय मतदार दिन** : निवडणूक जनजागृती वा निवडणूक पुनर्निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि १० ऑक्टोबर २०१९ रोजी केले होते याप्रसंगी प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्व व मतदानाची आवश्यकता याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी रा.से. यो.व ले. अमोल बंड, नोडल अधिकारी यांच्या संयोजनाखाली या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन १८ वर्षावरील विद्यार्थ्यांना मतदार म्हणून नोंदणी करण्यास प्रोत्साहित करण्यात आले. त्यांची फॉर्म वाटून मतदार नोंदणी सुध्दा करण्यात आली.दि २५ जानेवारी ला सुध्दा राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने ले. अमोल बंड व डॉ नागपुरे यांनी कार्यक्रम घेतला. या निमित्त रा.से.यो.चे सर्व विद्यार्थी तसेच राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.




१८.**दत्तापूर येथे पथनाट्य व विधानसभा निवडणुकीमध्ये दिव्यांग मतदारांना मदत:** दि १८ ऑक्टो.२०१९ रोजी कौन बनेगा करोडपती मधील विजेत्या सौ.बबितताई खाडे यांच्या उपस्थितीत दत्तापूर येथे मतदान जनजागृतीपर पथनाट्य सादर करीत विद्यार्थांनी लोकांना मोठ्या संख्येने मतदान करण्यास प्रोत्साहित केले. २१ ऑक्टो. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये रासेयो स्वयंसेवकांच्या चमू वेगवेगळया मतदान केंद्रावर मदतनीस म्हणून पाठवून दिव्यांग मतदारांना ने-आण करण्यास मदत करण्यात आली.

१९.**वाचन प्रेरणा दिन**: डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर २०१९ वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी वाचन केलेले पुस्तकांचे अवलोकन केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाला प्रा जितेंद्र बारूळकर,प्रा. कुरळकर, सर्व स्वयंसेवक व शिक्षक वर्ग उपस्थित होते.








रेड रिबन क्लब स्थापणा



२०. **दिवाळी फराळ वाटप** : दिवाळी सुट्ट्या दरम्यान कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रम व गरिबांना फराळ व फळे वाटून त्या उपेक्षितांचे जगणे व दिवाळी आनंदात केली. यासाठी विवेकानंद वृद्धाश्रम सावनेर येथे डॉ नरेंद्र नागपुरे स्वतः परिवारासोबत मदत करीत होते. या माध्यमातून सर्वांनी समाजाबद्धल आपली सामाजिक बांधिलकी व कर्तव्य परायणता दर्शविली.

२१.**संविधान दिन** : आदर्श महाविद्यालयामध्ये दि.२६ नोव्हेंबर २०१९ संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रा अमोल बंड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. माननीय प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मौलिक उदबोधन केले. कार्यक्रमाला डॉ नरेंद्र नागपुरे, डॉ कोपुलवार, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व रा.से.यो.चे सर्व स्वयंसेवक व अन्य शिक्षक वर्ग उपस्थित होते. या प्रसंगी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

२२.**जागतीक एड्स दिन (रेड रिबन क्लब)** : महाविद्यालयामध्ये दि.०२ डिसेंबर २०१९ जागतीक एडस दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा समन्वयक श्री अजयजी साखरे यांची प्रमुख उपस्थिती होती, त्यांनी उपस्थितांना एडस विषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.योगेंद्र गांडोळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून उदबोधन केले. यावेळी **'रेड रिबन क्लब'** ची स्थापना करण्यात आली व अध्यक्ष म्हणून आदर्श बरवट याची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ नरेंद्र नागपुरे, डॉ कोपुलवार, श्रीकांत पाटील व ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक किशोर पाथरे, रा.से.यो.चे सर्व स्वयंसेवक व अन्य शिक्षक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



उन्नत भारत अभियान कार्यशाळा
( अमरावती विद्यापीठ )





२३.**विद्यापिठ्स्तरीय उन्नत भारत अभियान कार्यशाळा** : दि २० दिसे.२०१९ रोजी एक दिवसीय उन्नत भारत अभियान कार्यशाळा महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल श्री.भगतसिंग कोश्यारी यांचे प्रमुख उपस्थितीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात आली. राज्यपाल कोश्यारी यांच्या भाषणातून उर्जा घेवून व अमरावती विद्यापीठाचे प्र-संचालक, रासेयो डॉ राजेश बुरंगे यांचेसह फोटो घेण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील रासेयो पथकाच्या १० विद्यार्थ्यांसह डॉ बायस्कर, डॉ नागपुरे कार्यक्रम अधिकारी व डॉ कोपुलवार महिला कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग घेतला.









२४.**संत गाडगे बाबा जयंती दिन निमित्त स्वच्छता रेली**: दि.२४ दिसे. २०१९ रोजी महाविद्यालयातर्फे संत गाडगे बाबा जयंती दिन निमित्त स्वच्छता रेलीचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी चौक धामणगाव रेल्वे येथून हिरापुरच्या मंदिरापर्यंत पायी स्वच्छता रेली काढण्यात आली. यावेळी रासेयो पथकाच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. काही विद्यार्थ्यांनी गाडगेबाबा चे रूप घेवून व भजन गावून लोकांमध्ये जनजागृती व प्रत्यक्ष कार्य करून स्वच्छतेचा संदेश दिला.

२५.**सावित्रीबाई फुले जयंती (अंधश्रद्धा निर्मुलन)**: दि. ३ जानेवारी २०२० सावित्रीबाई फुले जयंती निमित्त सामाजिक कार्यकर्त्या सपनाताई लांडे यांचे **'अंधश्रद्धा निर्मुलन व सावित्रीबाई फुले यांचे विचार'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राचार्यासह कार्यक्रम अधिकारी व सह-कार्यक्रम अधिकारी यांचेसह सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या पूर्णत्वासाठी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोलाचे सहकार्य केले.




२६. **८ गावात २५ किमी सायकल रेली (प्लास्टिक मुक्ती अभियान):** धामणगाव रेल्वे परिसरातील ग्रामीण लोकांना **पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती व आरोग्याबद्धल जागृतीसाठी** दि ४ जानेवारी २०२० रोजी सायकल रेली चे आयोजन करण्यात आले. रेली ला प्राचार्यासह धामणगाव शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री प्रदीप कुमार लुणावत यांनी हिरवी झेंडी दाखविली. हि रेली ८ गावातून जात असताना गावकरी पुरुष व महिलांना जनजागृती करीत विविध आशयाच्या फलकासह वर्तमानपत्रापासून निर्मित **कागदी व कापडी पिशव्या वितरण करीत प्लास्टिक पिशव्या न वापरण्याविषयी संदेश** देण्यात आले. जुना धामणगाव, शहापूर, दाभाडा, कावली, वसाड, वाठोडा, जळगाव या गावाला भेटी देत स्वतःच्या सायकलीने ५० रासेयो सक्रीय स्वयंसेवकानी २५ किमी पर्यंत सहभाग नोंदविला. कावली गावी प्रा निलेश मोहोकार यांच्या उपस्थितीत सर्वांनी **महिला रक्षणाची शपथ** घेतली. यामध्ये कार्यक्रम अधिकारी व सह-कार्यक्रम अधिकारी यांनी स्वतः सायकल चालवीत इतरांना प्रेरणा दिली.




२७. **२० किमी सायकल रेली व रक्तदान शिबीर**: सकाळी ६.३० वाजता डॉ राजू तुकराने व सेफला शाळेच्या चमूसोबत धामणगाव ते विरूळ रोंघे २० किमी सायकल रेली पूर्ण करून डॉ नागपुरे व डॉ कोपुलवार यांनी सक्रीय सहभाग दर्शविला. दिनांक १२ जानेवारी ला स्वामी विवेकानंद जयंतीचे औचीत्य साधून महाविद्यालयामध्ये भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये रक्त संकलन करण्याकरीता J.N.M.C. सावंगी मेघे येथील चमू आली होती. संप असूनही एकूण ६७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी धामणगाव शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री प्रदीपकुमार लुणावत, कार्य. सदस्य श्री अशोकजी भागवत, चेतन कोठारी (रक्त दान समिती अध्यक्ष) व संस्थेचे सर्व पदाधिकारी हे उपस्थित होते. अनेक विद्यार्थी व शिक्षकासह कार्यक्रम अधिकारी डॉ नरेंद्र नागपुरे यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या पूर्णत्वासाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोलाचे सहकार्य केले.




२८. **उन्नत भारत अभियान अंतर्गत वाढोणा व काशिखेड येथे ग्रामसभा** : दि. २६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनी उन्नत भारत अभियान अंतर्गत वाढोणा व काशिखेड येथे ग्रामसभा आयोजित केली. यामध्ये महाविद्यालयाचे समन्वयक डॉ सुधीर बायस्कर यांनी गावातील जनतेला संबोधित केले व यामध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ नागपुरे, सह-कार्यक्रम अधिकारी श्रीकांत पाटील, विशाल मोकाशे व आदर्श बरवट सह विद्यार्थी यांनी ग्रामस्थांचे प्रश्न व अडचणी जाणून घेतल्या.



२९. **दत्तक ग्राम वाढोणा व काशिखेड येथे उन्नत भारत अभियान सर्वेक्षण** : दि. २२ ते २४ जानेवारी २०२० रोजी उन्नत भारत अभियान अंतर्गत काशिखेड येथे रासेयो च्या विद्यार्थांनी विशाल मोकाशे च्या नेतृत्वात सर्वेक्षण संपन्न झाले. यामध्ये महाविद्यालयाचे अनेक स्वयंसेवक सहभागी होते. २७ ते ३० जानेवारी दरम्यान वाढोणा गावी सर्वेक्षण संपन्न झाले. दत्तक ग्राम वाढोणा १०४ तर काशिखेड येथील ८२ घराचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ नागपुरे, सह-कार्यक्रम अधिकारी श्रीकांत पाटील यांनी ग्रामस्थांचे प्रश्न व अडचणी जाणून घेवून सरपंच व ग्रामसेवक यांचेशी चर्चा केली.



३०. **गाजर गवत निर्मुलन कार्यक्रम** :प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात रा.से.यो. तर्फे अनेकवेळा गाजर गवत निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात आले. दि. २३ जानेवारीला महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला. या प्रसंगी डॉ. नागपुरे यांनी **व्यक्तिगत व परिसर स्वच्छता शपथ** अनेक विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमात रा.से.यो च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३१. **पुलवामा येथील शहीद जवानांना श्रद्धांजली** : महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे मार्गदर्शनाखाली व प्रा.डॉ नरेंद्र नागपुरे कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. व

ले. अमोल बंड यांच्या संयोजनाखाली कॅप्टन अशोक महाजन यांच्या उपस्थितीत दि. १४ फेब्रुवारी ला शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पुलवामा येथे झालेल्या भ्याड हल्याच्या निषेधार्थ शहीद जवानांना श्रद्धांजली च्या कार्यक्रमात सर्व रा.से.यो. स्वयंसेवकांनी व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. यासाठी विशाल मोकाशे याने कार्यक्रमाचे संचलन केले. या कार्यक्रमात NCC व NSS च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३२. **ग्राम ज्ञानपीठ लवादा केंद्र, धारणी येथील जिल्हास्तरीय विशेष शिबिरात सहभाग :** दि. २१ ते २८ फेब्रुवारी २०२० या कालावधीत ग्राम ज्ञानपीठ लवादा केंद्र (बोरी) ता. धारणी येथील जिल्हास्तरीय विशेष शिबिरात कु.पायल गुप्ता, गजानन मानकर, रोषण वरठी, सुरज कुटे, वृषभ गोहणे, तेजस वाळके या **६ विद्यार्थ्यांचा सहभाग** होता. दरम्यान **डॉ नरेंद्र नागपुरे, कार्यक्रम अधिकारी व डॉ माधुरी कोपुलवार** सह- कार्यक्रम अधिकारी हे सुद्धा धरणी येथे दोन दिवस करिता सेवा द्यायला गेले. विद्यापीठाचे प्र-संचालक डॉ राजेश बुरंगे, जिल्हा समन्वयक डॉ निलेश कडू, डॉ ठाकरे, डॉ स्मिता जाधव डॉ मंदा नांदुरकर व इतर २०० विद्यार्थांसह सामाजिक कार्यात सेवा देताना आपले योगदान दिले व वेगळा अनुभव प्राप्त झाला.

३३. **महात्मा फुले जयंती व मराठी राज्य भाषा दिन (एक भारत श्रेष्ठ भारत):** दि.२७ फेब्रुवारी २०१९ रोजी महात्मा फुले जयंती व मराठी राज्य भाषा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डॉ विनायक त्रीपत्तीवर मराठी विभाग प्रमुख व अनेक शिक्षक उपस्थित होते. 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत जोड राष्ट्र ओरिसा चे सदस्यांसोबत **Whatsapp Buddies हा ग्रुप** तयार करून स्वच्छता, आचरण व भाषा आदर संबंधित **शपथ ओरिया व मराठी दोन्ही भाषेतून** घेण्यात आली. रासेयो तर्फे 'भाषा वाचविण्याची गरज व महत्त्व' या विषयावर आयोजित **निबंध स्पर्धेचे** बक्षिष वितरण देखील करण्यात आले होते. यावेळी **करिअर मार्गदर्शन** करिता यवतमाळचे राजेंद्र भोयर यांनी सुंदर असे उदबोधन केले. याप्रसंगी नव-नियुक्त सर्व शिक्षकाचा सत्कार घेण्यात आला.

३४. **विद्यापिठ्स्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा :** दि ८ व ९ मार्च २०२० रोजी दोन दिवसीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील ७ रा.से.यो. स्वयंसेविका कु.रीना कुमरे, निकिता ठाकरे, शिवानी हुसनापुरे, चंचल पंचबुधे, पूनम कुऱ्हाडकर, चंचल खोत, स्नेहा तुमडाम यांनी सहभाग घेतला.



३५. **जागतीक महिला दिन सप्ताह व उन्नत भारत मार्गदर्शन कार्यशाळा :** दि ८ मार्च २०२० ला महाविद्यालयातर्फे दामिनी क्लब सोबत महिला दिनानिमित्त **IPS कुमार चिंता** यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यामध्ये संपूर्ण धामणगाव येथील विद्यार्थी व जनतेचा अपूर्व सहभाग होता. यावेळी यशस्वी महिलांचा व विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला. दि.१२ मार्च २०२० रोजी आयोजित उन्नत भारत मार्गदर्शन कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून **विभागीय उन्नत भारत अभियान समन्वयक डॉ अर्चना बारब्दे** यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ गांडोळे सह, डॉ. नरेंद्र नागपुरे, डॉ माधुरी कोपुलवार, डॉ सुधीर बायस्कर, इतर शिक्षक व रासेयो पथकाच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

३६. **७ दिवसीय NSS-ETI अहमदनगर ट्रेनिंग कार्यक्रम :** दि १० मार्च ते १६ मार्च २०२० दरम्यान अहमदनगर येथे आयोजित १४९ वे NSS ETI विशेष ट्रेनिंग कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी सहभाग घेतला व प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये सर्वच कार्यक्रम अधिकाऱ्यांना अनेक विषयावर मार्गदर्शन देण्यात आले व एक दिवस Field Visit विशेष भेट मध्ये श्री.अण्णा हजारे यांचे गाव राळेगणसिद्धी, श्री. पोपटराव पवार यांचे गाव हिवरेबाजार या गावी झालेला विकास पाहण्याकरिता नेले. त्यानंतर डॉ राजेंद्र धामणे यांनी 'महिला मनोरुग्नाकरिता तयार केलेलं मनगाव' पाहून भारावलेल्या सर्वांनी मिळून रु.१९,७५० रुपयाची मदत केली. विविध गोष्टींचे अनुभव व प्रशिक्षित लोकांकडून धडे शिकून प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्धल सर्वांना प्रशिक्षित झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले.

३७.**लॉकडाऊन काळात Covid19 महामारी बाबत जनजागृती** : दि. १८ मार्च ते १४ एप्रिल २०२० च्या Lockdown काळात माननीय प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांचे सूचनेनुसार सर्व अधिकारी यांनी स्वतः व सर्व स्वयसेवका मार्फत रोज सोशल मिडिया द्वारे कोरोना विषाणू बाबत सुरक्षिततेचे जनजागृतीचे कार्य केले. २२ मार्च ला जनता कर्फ्यू ला पूर्ण प्रतिसाद दिला व सकाळी सर्व विद्यार्थांनी प्रत्येकी १० लोकांना फोन करून कोरोना बाबत सावधगिरीच्या सूचना दिल्या. सायं ५ वाजता सर्वांनी घंटा व थाळी नाद करीत डॉक्टर, आरोग्य सेवक, पोलीस व स्वच्छता कर्मचारी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कोरोना महामारीच्या अश्या स्थितीत शारीरिक अंतर, रक्तदान विषयी व आपत्कालीन स्थितीत कोणत्याही मदतीसाठी तयार राहण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. श्री कुमार चिंता (IPS) ठाणेदार, धा. रेल्वे यांच्या संपर्कात राहून आवश्यक उपाययोजना केली. कोरोना महामारी बाबत सेवेसाठी Self4Society या MyGOV पोर्टल वर नोंदणी केली. व इतरांना घरी राहून 'Stay at home, save lives' प्रतिज्ञा घेवून सर्वांनी प्रतिज्ञापत्र मिळविले. सर्वाना 'आरोग्य सेतू' App डावूनलोड करून घ्यायला सांगितले .




३८.**लॉकडाऊन काळात संपूर्ण अमरावती जिल्हा मध्ये विविध Online स्पर्धेचे आयोजन** : 'Socially Distant, Digitally Connected' अंतर्गत अमरावती जिल्हा आणि परिसरात कार्यरत असलेल्या सर्व रासेयो च्या स्वयंसेवकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्यात असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले. कोरोनाने सर्वांना घरी बसविले आहे, याचा फायदा घेत अनेक स्वयंसेवक आपली प्रतिभाशक्ती उपयोगात आणून कोरोना विरुद्ध कसा लढा देता येईल ते समाजापर्यंत पोहचवता येईल म्हणून स्वयंसेवकांना प्रोत्साहित करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले. online स्पर्धा १५ एप्रिल पर्यंत होती. कविता, कथा, लेख, डिजिटल पोस्टर, अनुभव कथन व्हिडिओ (फक्त ३० सेकंद), घोषवाक्य, पथनाट्य (फक्त संहिता) एकपात्री अभिनय (फक्त १ मिनिट), इ. आणि वाटेल ते कलात्मकता असलेलं काहीही सर्व विद्यापीठातील फक्त रासेयो स्वयंसेवकांसाठी होती. **स्पर्धेचा विषय : 'कोरोना लढा, मानसिकता व माणुसकी' किवा 'निसर्गाच्या माध्यमातून कोरोना संकट'** हा होता. स्पर्धेच्या तयारीसाठी घराबाहेर पडायचे नाही अशी सूचना देवून साहित्य या nss.amvdmn@gmail.com या ईमेल आयडी वर साहित्य पाठवायचे सांगितले व whatsapp वर सुद्धा स्वीकारले. त्याला संपूर्ण जिल्ह्यातून भरभरून प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रम अधिकारी प्राचार्य